पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ११

**सभावृत्तांत**

दिनांक - **१७/०२/२०१६** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१७/०२/२०१६** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर - सभापती**
२. मा.जावेद रमजान शेख
३. मा.†›. नितीन ज्ञानेश्वर लांडगे
४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
५. मा.आसवाणी सविता धनराज
६. मा.पवार संगीता शाम

या शिवाय मा.फुंदे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.दुरगुडे - सहा.आयुक्त, मा.बेंडे - प्रशासन अधिकारी, मा.पानसरे - क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) महापौर चषक जिल्हास्तर व्हॉलीबॉल (पासिंग) स्पर्धा २०१५-१६ आयोजित करणेबाबत -

विषय क्र.३) महापौर चषक राज्यस्तर हँडबॉल स्पर्धा २०१५ आयोजित करणेबाबत -

विषय क्र.४) मराठी राजभाषा दिन साजरा करणेबाबत - मा.अरुण बो-हाडे, मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ०३/०२/२०१६ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १०)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ४८ विषय क्रमांक – ०१

दिनांक - १७/०२/२०१६ विभाग - क्रीडा विभाग

सुचक : मा.नितीन लांडगे अनुमोदक : मा.संगीता पवार

संदर्भ : मा.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/३४/२०१६, दि.१३/०१/२०१६

मा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.महापालिका सभा ठराव क्र.१२०६ दि.२०/१०/२०११ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१२,दि.०४/०७/२०१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे मा.आयुक्त यांचेकडील

दि.२२/१०/२०१२ चे मान्य प्रस्तावानुसार खेळाडू दत्तक योजने अंतर्गत खेळाडू निवड व खेळाडूंना लाभ देण्यासाठी समिती नेमलेली आहे. त्यानुसार क्रीडा विभागांतर्गत खेळाडू दत्तक योजना २०१५-१६ (चौथी बॅच) चे अर्जावर निर्णय घेणेकामी मा.सहा.आयुक्त (क्रीडा) यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/५७४/२०१५, दि.२७/१०/२०१५ नुसार क्रीडा अधिकारी, खेळाडू दत्तक योजना प्रमुख व संबंधित खेळाचे क्रीडा पर्यवेक्षक यांनी प्रस्तावात नमुद एकूण ५१ अर्जांपैकी ३४ खेळाडूंचे अर्ज पात्र करुन खेळाडू दत्तक योजना २०१५-१६ करीता लाभ देणेस व त्याकामी येणा-या र.रु.८१,३२,४००/- चे खर्चास व सदरचा खर्च "खेळाडू दत्तक योजना" या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ४९ विषय क्रमांक – ०२
दिनांक - १७/०२/२०१६ विभाग - क्रीडा विभाग
सुचक : मा.नितीन लांडगे अनुमोदक : मा.अरुण बो-हाडे
संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/१३६/२०१६, दि.१५/०२/२०१६

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, पुणे जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन यांचे मान्यतेने व जय गणेश युवा फौंडेशन, विनायकनगर, बो-हाडेवाडी, मोशी, पुणे ४१२ १०५ यांच्या सहकार्याने माहे मार्च २०१६ मध्ये विनायकनगर, बो-हाडेवाडी, मोशी, पुणे ४१२ १०५ येथे महापौर चषक जिल्हास्तर व्हॉलीबॉल (पासिंग) स्पर्धा २०१५-१६ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे एकूण र.रु.१०,२३,५००/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदरच्या खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.५,००,०००/- हा स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत विषयक खर्च र.रु.१,००,०००/- हा विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.४,२३,५००/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस तसेच स्पर्धा अनुषंगाने ट्रॉफीज, सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे, निमंत्रणपत्रिका, फ्लेक्स, बॅनर्स, क्रीडा साहित्य, इ.खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करून करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५० विषय क्रमांक – ०३
दिनांक - १७/०२/२०१६ विभाग - क्रीडा विभाग
सुचक : मा.अरुण बो-हाडे अनुमोदक : मा.संगीता पवार
संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/५५/२०१६, दि.१५/०२/२०१६

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, पुणे जिल्हा हॅन्डबॉल असोसिएशन यांचे मान्यतेने व पिंपरी चिंचवड हॅन्डबॉल असोसिएशन, आकुर्डी, पुणे ३५, तरुण मित्र मंडळ प्रणित सदभावना प्रतिष्ठान यांचे सहकार्याने माहे मार्च २०१६ मध्ये या काळात मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू माध्यमिक

विद्यालय मैदान व वसंतदादा पाटील प्राथमिक विद्यालय आकुर्डी, पुणे ३५ येथे महापौर चषक जिल्हास्तर हॅन्डबॉल स्पर्धा २०१५-१६ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे एकूण र.रु.४,४०,००८/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदरच्या खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.१,००,०००/- हा स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.२,९०,८०८/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस तसेच स्पर्धा अनुषंगाने ट्रॉफीज, सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे, निमंत्रणपत्रिका, फ्लेक्स, बॅनर्स, क्रीडा साहित्य, इ.खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करून करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५१ विषय क्रमांक – ०४

दिनांक - १७/०२/२०१६

सुचक : मा.अरुण बो-हाडे अनुमोदक : मा.समीर मासुळकर

संदर्भ : मा.अरुण बो-हाडे, मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत दिनांक २७ फेब्रुवारी २०१६ रोजी मराठी राजभाषा दिन व २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिना निमित्त या सप्ताहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक व कला धोरणांतर्गत पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, चिंचवड येथे आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **मासुळकर समीर मोरेश्वर** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ १०३ /२०१६
दिनांक : १८/०२/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.